माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ /४३९०/२०२३/कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| प्रियांका इंगवले | १) निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर<br>२) महसुल सहायक जमीन संकलन तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर | तहसिलदार, तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर |

**द्वितीय अपील सुनावणी दिनांक- १४.१२.२०२३**

अपिलार्थी यांनी दि. ०७.०७.२०२३ रोजी राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ पुणे यांचे कडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. अर्जदाराने द्वितीय अपिल दाखल करताना 'जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही' असे प्रयोजन नमूद केले.

आयोजित सुनावणीस अपिलार्थी हजर आहेत. विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

१. अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक २३.०१.२०२३ रोजीचा आहे.त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर, श्री. रविंद्र मोरे यांनी दिनांक ०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये श्री. मारुती मकर, मानिव जन माहिती अधिकारी तथा महसुल सहायक जमीन संकलन,तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत कळविले. त्यानंतर श्री. मारुती मकर, मानिव जन माहिती अधिकारी तथा महसुल सहायक जमीन संकलन,तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांनी केलेल्या कार्यवाहीचे कोणतेही अभिलेख आयोगास सादर केले नाही.
२. अपिलार्थीचे प्रथम अपिल दि. ०८.०३.२०२३ रोजीचे असुन त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांनी सुनावणी घेऊन दि. १३.०४.२०२३ रोजी आदेश दिला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार

शाहुवाडी व सहा. जन माहिती अधिकारी तथा महसुल सहायक जमीन संकलन यांनी अपिलार्थीस १५ दिवसात समक्ष अथवा नोंदणीकृत टपालाने विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले.

३. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार शाहुवाडी तसेच सहा. जन माहिती अधिकारी तथा महसुल सहायक जमीन संकलन यांनी प्रथम अपिल आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचे कोणतेही अभिलेख आयोगास सादर केले नाही.

४. सुनावणीचेवेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे कथन केले की, जन माहिती अधिकारी अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

५. आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, मौजे पिशवी येथील गायरान जमिन गट क्र. ११९७ मध्ये भुखंड वाटप संबंधित निकष, शासन नियम व परिपत्रक व न्यायालीयन आदेशाबाबतची माहिती विचारली आहे.

६. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर, श्री. रविंद्र मोरे यांनी अपिल आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

७. सहाय्यक तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा महसुल सहायक जमीन संकलन,तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर, श्री. मारुती मकर यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केली नाही तसेच अपिल आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(२) नुसार तहसिलदार, तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने मुद्देनिहाय सर्व माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांनी अपिल आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार कारवाई का करणेत येवू नये? याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

३. सहाय्यक तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा महसुल सहायक जमीन संकलन,तहसिल कार्यालय शाहुवाडी, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केलेली नाही तसेच अपिल आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार कारवाई का करणेत येवू नये? याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांनी वरील आदेशाची विहीत कालावधीत अंमलबजावणी होईल याबाबतची दक्षता घ्यावी.

५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांना आदेशित करण्यात येते की, यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दि.०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र. क्र. (२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

या निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ पुणे.**

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषित-</u>

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर